# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

निवडणूक विभाग
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
दूरध्वनी क्र. : २५६०११०८
फॅक्स क्र. : ०२०-२५६९२०३१
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

Election Section
Ganeshkhind, Pune 411 007
Phone No.: 25601108
Email Id.: election@pun.unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


**संदर्भ क्र. : साफुपुविनि/82** **दिनांक : 04 ऑगस्ट, २०१७**

प्रति,
मा. अध्यक्ष / मा. सचिव,
सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्थांचे व्यवस्थापन मंडळ

**विषय** :- संलग्न महाविद्यालय / परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा प्रतिनिधींच्या निवडणुकीकरीता मतदार यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन नाव नोंदणीची मुदतवाढीबाबत.

**संदर्भ** :- १) या कार्यालयाचे पत्र क्र. साफुपुविनि/३८A दिनांक १६ जून, २०१७.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. साफुपुविनि/६० दिनांक १८ जुलै, २०१७.
३) या कार्यालयाचे पत्र क्र. साफुपुविनि/७३ दिनांक २९ जुलै, २०१७.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भाकिंत विषयास अनुसरुन सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्या व्यवस्थापनाचा अध्यक्ष किंवा सचिव किंवा व्यवस्थापन शिफारस करील अशा व्यवस्थापन प्रतिनिधींची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८ (२) (त) (28) (2) (p) अन्वये सहा (६) प्रतिनिधी संलग्न महाविद्यालय/परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून देण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणीची माहिती विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर भरण्याची मुदत सोमवार, दिनांक १९ जून, २०१७ ते मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०१७ या कालावधीपर्यंत (कार्यालयीन वेळेत) देण्यात आलेली असून सदर माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमून्यातील) प्रतीसह विद्यापीठ कार्यालयाकडे शनिवार, दिनांक २२ जुलै, २०१७ पर्यंत स्वीकारण्यात येणार होती. तसेच संदर्भ क्र. २ च्या पत्रानुसार ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करण्याची मुदत शनिवार, दिनांक २९ जुलै, २०१७ पर्यंत वाढविलेली असून सदर माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमून्यातील) प्रतीसह शुक्रवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१७ पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे स्वीकारण्यात येणार होती. तसेच संदर्भ क्र. ३ च्या पत्रानुसार ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करण्याची मुदत गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ पर्यंत वाढविलेली असून सदर माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमून्यातील) प्रतीसह मंगळवार, दिनांक ०८ ऑगस्ट, २०१७ पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे स्वीकारण्यात येणार आहे.

याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालय / परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा प्रतिनिधींच्या निवडणुकीकरीता मतदार यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन नाव नोंदणी करण्याची मुदत **सोमवार, दिनांक ०७ ऑगस्ट, २०१७** पर्यंत वाढविलेली असून सदर माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या (विहित नमून्यातील) प्रतीसह **शनिवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१७** पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ येथे कार्यालयीन वेळेत पोहोचेल अशा रितीने पाठवावी. आवश्यकता भासल्यास खास दुताकरवी माहिती पाठवावी. ठरावाच्या प्रतीवर व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षांची आणि सचिवांची स्वाक्षरी व इतर माहिती असणे आवश्यक आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालय / परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून विद्यापीठ अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सहा प्रतिनिधींच्या निवडणुकीकरीता मतदार यादी तयार करण्यासाठी **शनिवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०१७** नंतर आलेली माहिती, अपूर्ण माहिती (आवश्यक ती कागदपत्र न जोडलेले), व ठराव विहित नमुन्यात नसल्यास विचारात घेतली जाणार नाही आणि त्यातील नावाचा मतदार यादीमध्ये समावेश केला जाणार नाही याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आपला,

5/8/17

**(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)**
प्रभारी कुलसचिव